4185

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय् खलनिग्रहणाय्

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक पोअय/कक्ष-6/पाणी ॲक्वा/दरपत्रके/ /202
कार्यालय पोलीस अधिक्षक , यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 11.05.2023 11 MAY 2023

**दरपत्रक मागणीपत्र**

**विषय :-पोलीस अधिक्षक कार्यालय व शाखेकरीता सन 2023-2024 करीता पाणी कॅन (ॲक्वा) आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरीता दरपत्रके सादर करणेबाबत..**

---000---

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, पोलीस अधिक्षक कार्यालय व विविध शाखेकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेकरीता पाणी ॲक्वा कॅन चा पुरवठा करण्याकरीता 1 वर्षाकरीता करार करण्यात येणार आहे. खालील नमुद वस्तुचे दर बंद लिफाफयात /पॉकीटात अटी व शर्तीच्या प्रमाणपत्रासह **दिनांक 19/05/2023 पर्यंत न चुकता कार्यालयास सादर करावे**.

(बंद पाकीट/लिफाफयावर पोलीस अधिक्षक कार्यालय करीता पणी कॅन पुरवठा (ॲक्वा) दरकरार पत्रक असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.)

2/- सदर दरपत्रके पोलीस उपअधिक्षक (गृह) यांचे समक्ष दिनांक 22/05/2023 रोजी उघडण्यात येतील.

खालील नमुन्यात पाणी कॅन चे दर नावासामोर दर्शविण्यात यावेत.

| अक्र. | विवरण | सर्व करासहीत एकुण रक्कम प्रती कॅनवे दर नमुद करावे. |
|---|---|---|
| 1. | पाणी कॅन )ॲक्वा) 16 लिटर प्रती कॅन (पिण्याचे पाणी पुरवठा) | |

**अटी व शर्ती**

1. मान्य केलेले दर 1 वर्षाकरीता वैध राहील.

2. दररोज पाणी कॅनचा (ॲक्वा) पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ मधील विविध शाखेमध्ये दररोज सरासरी 40 कॅनची आवश्यकता असणार आहेत.सदर पाणी कॅनचा पुरवठा स्वखर्चाने (उदा. वाहतुक खर्च, हमाली खर्च) करावा लागेल. दरपत्रक धारकाला त्याने दरपत्रकामध्ये सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही अपरीहार्य कारणास्तव कोणत्याही प्रकारची दरवाढ करुन देण्यात येणार नाही.

3.पाण्याचा पुरवठा हा नियमीतपणे करावा लागेल. पाण्याचा पुरवठा नियमीतपणे न केल्यास आपले देयक मंजुर करण्यात येणार नाही.पिण्याचे पाणी ॲक्वा व्यतीरीक्त असल्यास पाण्याची कॅन स्विकारण्यात येणार नाही.

4.प्रत्येक महीण्याचे देयक बिल क्रमांक, रक्कम निहाय विस्तुत अनुसुची/अनुक्रमणिका निहाय पुढील महीण्याच्या 10 तारखेपर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

5.चालु वर्षाचा करार संपुष्टात आल्यानंतर पुढील वर्षासाठी दरपत्रक प्रक्रीया पुर्ण होईपावेतो पुरवठादाराला त्यांनी मान्य केलेल्या दरानेच पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहील.

6.पाणी कॅन ॲक्वा खरेदीची देयक शासनाकडुन प्राप्त होण्या-या अनुदानाप्रमाणे काढण्यात येतील. अनुदानाअभावी देयकास विलंब झाल्यास या कार्यालयाकडुन विलंब आकारणी अनुज्ञेय राहणार नाही.तसेच पुरवठादारास कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

**(मा.पो.अ.मान्यतेने)**

**(सुशिला पवार)**
**कार्यालय अधिक्षक**
**पोलीस अधिक्षक यवतमाळ करीता**

प्रति, प्रभारी अधकारी सायबर सेल यवतमाळ.

2/- सदर प्रसिध्दी पत्र यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या संकेतस्थळावर दि.19/05/2023 रोजीचे 17.00 वाजेपर्यत प्रसिध्द करावे.